

# त्र्यं.वि.यांची लेखनतत्वे संशोधकांनी शोधावी

## प्रा.निशिकांत ठकार यांचे आवाहन

**वार्ताहर,**

**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर-**

प्राध्यापक त्र्यं.वि.सरदेशमुखांची लेखन तत्वे समीक्षकांनी शोधावी त्यातून त्यांच्या तत्कालीन सामाजिक स्थित्यंतराची परिस्थिती आपल्याला कळेल, असे प्रतिपादन समीक्षक प्रा.निशिकांत ठकार यांनी केले.

साहित्य अकादमी नवी दिल्ली , संगमेश्वर कॉलेज, मराठी विभाग आणि मसाप यांच्या विद्यमाने परिसंवादात बोलत होते. प्राचार्य शोभा राजमान्य, ॲड.जे. जे. कुलकर्णी, डॉ.सुहास पुजारी, डॉ.महादेव देशमुख उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, भाषेचे गारुड वाचकांवर सरदेशमुख सरांनी निमिण केले होते. त्यांचे मंत्र सामर्थ्य वाचकाला ऊर्जा देणार होते. वाचकाला कलाकृतीच्या मुळाशी जाऊन आत्मप्रत्ययाच अनुभव देणारे त्यांचे लेखन होते. त्या लेखनाचा अभ्यास संशोधकांनी करावा. आताच्या नव्या पिढीला त्यांच्या साहित्याची ओळख व्हावी यासाठी अशा कार्यक्रमच्या माध्यमातून विचारमंथन होत असते. प्रारंभी आकाशवाणी केंद्र निर्मित 'ऐसी अक्षरे रसिके' या कार्यक्रम मालिकेतील सरदेशमुख यांच्या समग्र साहित्यकृतींचा परिचय करून दिलेल्या ध्वनिमुद्रित कार्यक्रमाच प्रसारण झाले. याप्रसंगी आकाशवाणी सोलापूर केंद्राच्या सहाय्यक संचालक सुनील शिनखेडे, राजशेखर शिंदे, कवी हेमकिरण पत्की ,चित्रपट समीक्षक विजय पाडळकर, नितीन वैद्य ,पत्रकार रजनीश जोशी, उपप्राचार्य धनाप्पा मैत्री,वंदना पुरोहित, डॉ.सारीपुत्र तुपेरे, संघप्रकाश दुड्डे, मनोज कुलकर्णी, राजा होळकुंदे, प्रिया निघोजकर , डॉक्टर दत्ता घोलप, रमेश शिंदे, दत्ता सुरवसे, पद्माकर कुलकर्णी, प्रा. नरेंद्र काटीकर, प्रा.एस बी निंबर्गी, दत्तात्रय गुड्डेवाडी आदी साहित्यप्रेमी आणि संशोधक मंडळी उपस्थित होती.

# त्र्यं.वि.सरदेशमुख यांची लेखन तत्त्वे समीक्षकांनी शोधावी : प्रा. ठकार




**प्रा. त्र्यं.वि. सरदेशमुख जन्मशताब्दीनिमित्त आयोजित राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्‍घाटनप्रसंगी प्रा. निशिकांत ठकार, प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य, ॲड. जे.जे. कुलकर्णी, डॉ. सुहास पुजारी, डॉ. महादेव देशमुख आदी.**

**सोलापूर / प्रतिनिधी**

भाषेचं गारुड वाचकांवर सरदेशमुख यांनी निर्माण केलं होतं. त्यांचं मंत्र सामर्थ्य वाचकाला ऊर्जा देणारं होतं. वाचकाला कलाकृतीच्या मुळाशी जाऊन आत्मप्रत्ययाचा अनुभव देणारं त्यांचं लेखन होतं. त्या लेखनाचा अभ्यास संशोधकांनी करावा. त्र्यं.वि. सरदेशमुखांची लेखन तत्त्वे समीक्षकांनी शोधावी, त्यातून त्यांच्या तत्कालिन सामाजिक स्थित्यंतराची परिस्थिती आपल्याला कळेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्राध्यापक निशिकांत ठकार यांनी केले. साहित्य अकादमी नवी दिल्ली, संगमेश्वर कॉलेज मराठी विभाग आणि मसाप पुणे, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिसंवादात प्रा. ठकार बोलत होते. या उद्‍घाटन सत्रात मंचावर प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य, ॲड. जे.जे. कुलकर्णी, मराठी विभागप्रमुख डॉ. सुहास पुजारी, डॉ. महादेव देशमुख आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, आताच्या नव्या पिढीला त्यांच्या साहित्याची ओळख व्हावी यासाठी अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून विचारमंथन होत असतं. साहित्य प्रकारातील समीक्षा, कविता आणि कादंबरी ही अंगे आताच्या विद्यार्थ्यांना समजण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे ठरतात.

प्रारंभी आकाशवाणी सोलापूर केंद्र निर्मित 'ऐसी अक्षरे रसिके' या कार्यक्रम मालिकेतील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. सरदेशमुख यांच्या समग्र साहित्यकृतींचा परिचय करून दिलेल्या ध्वनिमुद्रित कार्यक्रमाचं प्रसारण झालं.

प्रा.डॉ. पुजारी यांनी या चर्चासत्रामागचा हेतू स्पष्ट केला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. राजमान्य यांनी प्रा. सरदेशमुख यांच्या आठवणींना उजाळा दिला.

याप्रसंगी आकाशवाणी सोलापूर केंद्राचे सहाय्यक संचालक सुनील शिनखेडे, दयानंद महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. राजशेखर शिंदे, कवी हेमकिरण पत्की, चित्रपट समीक्षक विजय पाडळकर, नितीन वैद्य, पत्रकार रजनीश जोशी, उपप्राचार्य धनाप्पा मैत्री, वंदना पुरोहित, डॉ. सारीपुत्र तुपेरे, संघप्रकाश दुड्डे, मनोज कुलकर्णी, राजा होळकुंदे, प्रिया निघोजकर, डॉ. दत्ता घोलप, रमेश शिंदे, मसापचे दत्ता सुरवसे, पद्माकर कुलकर्णी, प्रा.नरेंद्र काटीकर, प्रा. एस.बी. निंबर्गी, दत्तात्रय गुड्डेवाडी आदी साहित्यप्रेमी आणि संशोधक मंडळी उपस्थित होती. सूत्रसंचालन प्रा. संतोष पवार यांनी केले. तर जे.जे. कुलकर्णी यांनी आभार मानले.